# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र.शि.वि./4617
दि. 28/07/2015

प्रति,

**सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
मराठी/हिंदी माध्य. शाळा, म.न.पा. नागपूर

**विषय :– समाजकल्याण विभागातर्फे इ. 9 वी व 10 वी मधील अनुसुचित जातीच्या मुला–मुलींना मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती ऑनलाईन योजना राबविणेबाबत.**

**संदर्भ :– 1) शासन निर्णय क्र. इबीसी 2012/प्र.क्र. 151/शिक्षण–1 दि. 04.10.2013**
**2) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/9 वी–10 वी/मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती/ऑनलाईन/15–16/का–4/1077, दि. 19 मे 2015**
**3) पत्र क्र.जिपना/सकवि/ई–स्कॉलरशीप/2015–16/1208, दि. 21.07.2015**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र. 1 अन्वये शासनाने 9 वी व 10 वी मध्ये शिकणाऱ्या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व योजना सुरू केलेली आहे. संदर्भ क्र. 2 अन्वये या योजनेकरिता **शैक्षणिक सत्र सन 2015–16 पासून केवळ विद्यार्थ्यांच्या नावाचेच जातीचे प्रमाणपत्र** स्वीकारण्याबाबत मा. आयुक्त,समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सूचना दिलेली आहे. सन 2014–15 मध्ये ज्या विद्यार्थ्यांकडे त्यांच्या वडीलांचा सख्या भावाचा किंवा बहिणीचा दाखला असेल अशा विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज स्विकारण्याची सवलत देण्यात आली होती. परंतु ही सवलत केवळ सन् 2014–15 करिता असल्याचे सदर पत्रात नमुद केली आहे.

या योजनेसाठी सक्षम अधिकाऱ्यांच्या उत्पन्नाचा दाखल्याची आवश्यकता नाही. जर पालक नोकरीत असतील तर त्यांनी वार्षिक उत्पन्नाबाबत Employer Certificate देणे आवश्यक आहे आणि जर पालक नोकरीत नसतील तर त्यांनी साध्या कागदावर लेखी हमीपत्रावर वार्षिक उत्पन्न देणे आवश्यक आहे. नोकरीत असलेल्या व अन्य उत्पन्न असलेल्या पालकांनी मात्र Employer Certificate आणि साध्या कागदावर लेखी हमी पत्रावर त्यांचे सर्व मार्गांनी मिळून असणारे वार्षिक उत्पन्न अशी दोन कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे ई–शिष्यवृत्ती अंतर्गत शाळेच्या युझर–आयडी मधून कोणत्याही शिष्यवृत्तीकरिता ऑनलाईन भरलेल्या अर्जामधील सर्व विद्यार्थी व त्यांच्या तपशीलाबाबत संबंधित शाळेचे मुख्याध्यापक सर्वस्वी जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे अर्ज सादर करतांना हार्डकॉपीसह जोडलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांचा संपूर्ण संच शाळेच्या कार्यालयीन प्रतीसह नस्तीला लावणे आवश्यक आहे. जेणे करून शाळेच्या शिष्यवृत्तीबाबतच्या तपासणीचे वेळी सर्व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होतील. वरील सर्व सुचना विचारात घेऊन आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून आपले स्तरावरून योग्य कार्यवाहीस्तव तात्काळ निर्गमित कराव्या आणि या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

सदर योजनेतून एकही लाभार्थी विद्यार्थी वंचित राहणार नाही. याची मुख्याध्यापकांनी व सर्व सहा. शिक्षक यांनी नोंद घ्यावी. एखादया पालकांची तक्रार कार्यालयास प्राप्त झाल्यास संबंधित शाळेतील मुख्याध्यापक व सहा. शिक्षक यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. याची आपण सर्वांनी नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी :–

1) मा. आयुक्त, मनपा नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा. अप्पर आयुक्त, मनपा नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
3) मा. उपायुक्त, मनपा नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
4) मा. शिक्षण सभापती, मनपा नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
5) सहा.शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) मनपा नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर